चाणक्य मंडल परिवार

प्रश्नपुस्तिका क्रमांक CMPT000

**BOOKLET No.**

## प्रश्नपुस्तिका

**Paper 2**

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 50

एकूण गुण : 100

## सूचना

(1) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(2) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

(3) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.**

(5) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(8) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील''.**

(9) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

चाणक्य मंडल परिवार

1. काही परिस्थितीत केंद्र सरकार सक्तीने भारतीय नागरिकत्व संपुष्टात आणते. त्यासंदर्भात चुकीचे विधान/ने कोणते/ ती?

(अ) नागरिक सामान्यपणे सलग सात वर्षे भारताच्या बाहेर वास्तव्य करीत असेल.

(ब) स्वीकृतीने नागरिकत्व मिळाल्यानंतर पाच वर्षांच्या कालावधीत त्यास कोणत्याही देशात तीन वर्षे कैद झाली असेल.

पर्यायी उत्तरे

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) अ आणि ब दोन्ही
(4) अ आणि ब दोन्हीही नाही

In some cases, the central government forcibly terminates Indian citizenship. Which is/are the wrong statement/s in that regard?

(a) The citizen has been ordinarily resident out of India for seven consecutive years.

(b) The citizen has been imprisoned for three years in any country within a period of five years after acquiring citizenship by naturalisation.

Answer options

(1) Only a
(2) Only b
(3) Both a and b
(4) Neither a nor b

---

2. परदेशस्थित भारतीय नागरिक कार्डधारकाला खालील अधिकार नसतात-

(अ) तो राष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीसाठी पात्र नसेल.

(ब) त्याला लोकसेवेमध्ये समान संधीचा हक्क नसेल.

(क) तो भारतात मालमत्ता खरेदी करू शकत नाहीत.

(ड) तो मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्र नसेल.

पर्यायी उत्तरे

(1) अ, ब, क, ड
(2) ब, क, ड
(3) अ, ब, ड
(4) अ, ब, क

An Overseas Citizen of Indian (OCI) have not the following rights-

(a) He shall not be eligible for election as President.

(b) He shall not be entitled to equal opportunity in public service.

(c) He cannot buy property in India.

(d) He is not be entitled for registration as a voter.

Answer options

(1) a, b, c, d
(2) b, c, d
(3) a, b, d
(4) a, b, c



चाणक्य मंडल परिवार

3. खालील विधाने विचारात घ्या:

(अ) भारतात जन्माने नागरिक तसेच वास्तव्याने नागरिक असलेली व्यक्ती राष्ट्रपती पदासाठी पात्र असते.

(ब) अमेरिकेत केवळ जन्माने नागरिक असलेली व्यक्ती अध्यक्षपदासाठी पात्र असते.

वरीलपैकी कोणते विधान अचूक नाही?

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) अ आणि ब दोन्ही
(4) अ आणि ब दोन्हीही नाही

Consider the following statements :

(a) A person who is a citizen of India by birth as well as a naturalised citizen is eligible for the office of President.

(b) In USA, Only a citizen by birth is eligible for the office of president.

Which of the above statements is not correct?

(1) Only a
(2) Only b
(3) Both a and b
(4) Neither a nor b

---

4. भारतीय राज्यघटनेत नागरिकत्व मिळण्याचे पुढील पाच मार्ग सांगितले आहेत-

(अ) जन्माने
(ब) वंशपरंपरेने
(क) नोंदणीने
(ड) स्वीकृतीने
(इ) प्रदेश विलीन करणाने
(फ) राष्ट्रीयकरणाने

पर्यायी उत्तरे

(1) अ, ब, क, ड, इ
(2) अ, ब, क, ड, फ
(3) अ, ब, क, इ, फ
(4) यापैकी नाही

The Constitution of India mentions following five ways of acquiring citizenship-

(a) By birth
(b) By descent
(c) By registration
(d) By naturalisation
(e) By incorporation of territories
(f) By nationalisation

Answer options

(1) a, b, c, d, e
(2) a, b, c, d, f
(3) a, b, c, e, f
(4) None of this

5. भारतीय नागरिकत्वासंबंधी खालीलपैकी कोणते विधान असत्य आहे?

(1) नागरिकत्वाची नोंद राज्यघटनेच्या समवर्ती सूचीमध्ये करण्यात आली आहे.

(2) संविधानाने 'नागरिक' या शब्दाची व्याख्या केलेली नाही परंतु नागरिकत्वाचा हक्क असलेल्या व्यक्तींच्या विविध श्रेणींचा तपशील भाग 2 मध्ये दिला आहे.

(3) संविधानाच्या कलम 5 ते कलम 11 मधील तरतुदी 26 नोव्हेंबर 1949 पासूनच अंमलात आल्या.

(4) भारतीय घटनेत नागरिकत्व मिळविणे किंवा गमावणे यासंदर्भात कोणत्याही तरतुदी करण्याचा अधिकार संसदेला आहे.

Which of the following statement regarding Indian citizenship is not true?

(1) Citizenship is mentioned in the concurrent list of the Constitution.

(2) The Constitution does not define the word 'citizen' but the various categories of persons entitled to citizenship are detailed in Part II.

(3) The provisions under Article 5 to Article 11 of the Constitution came into force from 26 November 1949.

(4) Parliament has power to make any provision regarding acquisition or loss of citizenship in the Indian constitution.

---

6. असत्य विधान ओळखा.

(1) भारतीय राज्यघटनेतील नागरिकत्वाची तरतूद ब्रिटनच्या नागरिकत्वाशी साधर्म्य दाखवते.

(2) अमेरिका, कॅनडा आणि स्वित्झर्लंड अशा संघराज्य प्रणालींच्या देशात दुहेरी नागरिकत्व पद्धती प्रचलित आहे.

(3) भारतीय नागरिकांना संपूर्ण देशात नागरिकत्वाचे समान राजकीय व नागरी अधिकार आहेत.

(4) यापैकी नाही.

Identify the false statement.

(1) The citizenship provision in the Indian Constitution is analogous to citizenship of Britain.

(2) The system of double citizenship adopted in the federal countries like USA, Canada and Switzerland.

(3) Indian citizens have equal political and civil rights of citizenship all over the country.

(4) None of these.

7. कोणत्या प्रकरणात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने प्रथमच संविधानाच्या 'मूलभूत संरचनेचा' सिद्धांत मांडला?

(1) गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य
(2) केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य
(3) मिनर्व्हा मिल्स विरुद्ध भारतीय संघराज्य
(4) वामन राव विरुद्ध भारतीय संघराज्य

In which case did the Supreme Court of India give for the first time the doctrine of 'basic structure' of the Constitution?

(1) Golaknath vs. State of Punjab
(2) Kesavananda Bharati vs. State of Kerala
(3) Minerva Mills vs. Union of India
(4) Waman Rao vs. Union of India

---

8. कोणत्या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने मुलभूत संरचनेचे तत्व अंगीकारले?

(1) ए. के. गोपालन खटला (1950)
(2) केशवनंद भारती खटला (1973)
(3) वामन राव खटला (1981)
(4) गोलकनाथ खटला (1967)

In which case the Supreme Court adopted the principle of basic structure?

(1) A. K. Gopalan Case (1950)
(2) Kesavananda Bharati Case (1973)
(3) Waman Rao Case (1981)
(4) Golaknath Case (1967)

---

9. (अ) सर्वोच्च न्यायालयाने मुलभूत हक्क खटला या नावाने ओळखल्या जाणाऱ्या केशवानंद भारती खटल्यात प्रथमच न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या तत्वाचा राज्यघटनेच्या मुलभूत संरचनेत समावेश केला.

(ब) सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक खटला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदिरा गांधी खटल्यात प्रथमच न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या तत्वाचा राज्यघटनेच्या मुलभूत संरचनेत समावेश केला.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ बरोबर
(2) फक्त ब बरोबर
(3) अ आणि ब दोन्ही बरोबर
(4) अ आणि ब दोन्हीही चूक

(a) The Supreme Court incorporated the principle of judicial review into the basic structure of the Constitution for the first time in the Kesavananda Bharati Case which is also known as the Fundamental Rights Case.

(b) The Supreme Court incorporated the principle of judicial review into the basic structure of the Constitution for the first time in the Indira Gandhi Case which is also known as the Election Case.

Answer options

(1) Only a is correct
(2) Only b is correct
(3) Both a and b are correct
(4) Both a and b are incorrect

10 ________ या तारखेनंतर केलेल्या घटनादुरुस्ती कायद्यांना सर्वोच्च न्यायालयाने मुलभूत संरचनेचे तत्व लागू केले आहे.

(1) 24 एप्रिल 1973
(2) 24 एप्रिल 1976
(3) 3 मे 1976
(4) 3 मे 1973

The Supreme Court has applied the principle of basic structure to constitutional amendment enacted after ________

(1) 24 एप्रिल 1973
(2) 24 एप्रिल 1976
(3) 3 मे 1976
(4) 3 मे 1973

---

11. खालीलपैकी कोणते राज्यघटनेच्या मुलभूत संरचनेचे घटक आहेत?

(अ) व्यक्तीचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा
(ब) भारतीय राज्यव्यवस्थेचे समाजवादी स्वरूप
(क) राज्यघटनेचे संघराज्यीय स्वरूप
(ड) अधिकारांची विभागणी
(इ) कायद्याचे राज्य

पर्यायी उत्तरे:

(1) अ, क, इ
(2) ब, क, ड, इ
(3) अ, क, ड, इ
(4) अ, ब, क, ड, इ

Which of the following are the elements of the basic structure of the Constitution?

(a) Freedom and dignity of the individual
(b) Socialist nature of Indian polity
(c) Federal nature of the Constitution
(d) Separation of powers
(e) Rule of Law

Answer Options:

(1) a, c, e
(2) b, c, d, e
(3) a, c, d, e
(4) a, b, c, d, e

---

12. कोणत्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने 'संघराज्यवाद' हे घटनेचे मुलभूत वैशिष्ट्ये असल्याचे सांगितले आहे?

(1) केशवनंद भारती खटला (1973)
(2) एस. आर. बोम्मई खटला (1994)
(3) मनेका गांधी खटला (1978)
(4) शंकरी प्रसाद खटला (1951)

In which case, does the Supreme Court emphasise that 'the Indian Constitution is founded on the bedrock of the balance between the Fundamental Rights and the Directive Principles'?

(1) Kesavananda Bharati Case (1973)
(2) S. R. Bommai Case (1994)
(3) Maneka Gandhi Case (1978)
(4) Shankari Prasad Case (1951)



चाणक्य मंडल परिवार

13. खालीलपैकी अचूक विधाने ओळखा.

(अ) भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाचा पुनर्विचार करण्यासाठी कॉंग्रेसने डिसेंबर 1948 मध्ये भाषावार प्रांत समिती स्थापन केली.

(ब) जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि पट्टाभी सीतारामय्या हे या समितीचे सदस्य होते.

(क) ऑक्टोबर 1953 मध्ये समितीने अहवाल सादर केला.

(ड) समितीने राज्यांच्या पुनर्रचनेसाठी भाषा हा आधारभूत घटक अधिकृतरित्या अमान्य केला.

पर्यायी उत्तरे :

(1) अ आणि ड बरोबर
(2) अ, ब, क बरोबर
(3) अ, ब, ड बरोबर
(4) वरील सर्व विधाने बरोबर आहेत.

Identify the correct statements among the following.

(a) The Congress constituted the Linguistic Provinces Committee in December 1948 to reconsider the question of language-base provincialisation.

(b) Jawaharlal Nehru, Vallabhbhai Patel and Pattabhi Sitaramayya were members of this committee.

(c) In October 1953, the committee submitted its report.

(d) The committee officially rejected language as a basic factor for the reorganisation of states.

Answer option

(1) a and d are correct
(2) a, b, c are correct
(3) a, b, d are correct
(4) All the above statements are correct.

---

14. राज्यांच्या स्थापनेनुसार योग्य क्रम लावला.

(अ) मणिपूर
(ब) त्रिपुरा
(क) मिझोराम
(ड) हिमाचल प्रदेश

पर्यायी उत्तरे :

(1) अ- ब- क- ड
(2) ड- क- अ- ब
(3) ड- अ- ब- क
(4) क- अ- ब- ड

Arranged in the correct order according to the formation of the states.

(a) Manipur
(b) Tripura
(c) Mizoram
(d) Himachal Pradesh

Answer options

(1) a- b- c- d
(2) d- c- a- b
(3) d- a- b- c
(4) c- a- b- d

15. 'भारत हा विनाशी राज्यांचा अविनाशी संघ आहे', असे कोणत्या कलमांतून स्पष्ट होते?

(1) कलम – 1
(2) कलम – 2
(3) कलम – 3
(4) कलम- 4

Which article states that 'India is an indestructible union of destructible states'?

(1) Article- 1
(2) Article- 2
(3) Article- 3
(4) Article- 4

---

16. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) 1961 मध्ये गोवा, दमण आणि दीव पोलिस कारवाईने हे तिन्ही भाग पोर्तुगीजांकडून घेण्यात आले.

(ब) बारावी घटनादुरुस्ती अधिनियम, 1962 अन्वये या क्षेत्रांना केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला.

(क) 1986 मध्ये गोव्याला भारतातील पंचविसाव्या राज्याचा दर्जा देण्यात आला.

(ड) 2019 मध्ये दादरा व नगर हवेली आणि दमण व दीव यांचे एकत्रीकरण करून त्यांचा एकच केंद्रशासित प्रदेश करण्यात आला.

वरीलपैकी सत्य विधाने ओळखा.

(1) फक्त अ आणि ब
(2) फक्त क आणि ड
(3) फक्त अ आणि क
(4) फक्त ब आणि ड

Consider the following statements.

(a) Goa, Daman and Diu were taken from the Portuguese in 1961 by police operation.

(b) Under the Twelfth constitutional amendment Act, 1962 these areas were given the status of Union Territories.

(c) In 1986, Goa was given the status of the twenty-fifth state of India.

(d) In 2019, Dadra and Nagar Haveli and Daman and Diu were merged into one Union Territory.

Identify the true statements from the above.

(1) Only a and b
(2) Only c and d
(3) Only a and c
(4) Only b and d



चाणक्य मंडल परिवार

17. खालीलपैकी चुकीचे/ ची विधान/ ने कोणते/ती?

(अ) राज्यघटनेत 14 वा घटनादुरुस्ती कायदा, 1962 नुसार कलम 239 A समाविष्ट करण्यात आले, त्यानुसार पद्दुचेरीसाठी विधानसभा किंवा मंत्रिमंडळ किंवा दोन्ही निर्माण करण्याचा अधिकार देण्यात आला.

(ब) 1991 च्या 69 व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे राज्यघटनेत कलम 239 AA समाविष्ट करण्यात आले, त्यात दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रासाठी विधानसभा व मंत्रिमंडळाची तरतूद करण्यात आली.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) अ आणि ब दोन्ही
(4) ना अ, ना ब

Which of the following statement/s is/ are incorrect?

(a) Article 239 A was inserted by the 14th constitutional amendment Act, 1962, which empowers to form a Legislative Assembly or a council of ministers or both for Padducherry.

(b) Article 239AA was inserted in 1991 by the 69th constitutional amendment Act, which provided for a Legislative Assembly and a council of ministers for the National Capital Territory of Delhi.

Answer options

(1) Only a
(2) Only b
(3) Both a and b
(4) Neither a nor b

चाणक्य मंडल परिवार

18. खालीलपैकी अचूक पर्याय कोणता?

| तरतूद | कलम |
|---|---|
| (अ) संघराज्य प्रदेशासाठी उच्च न्यायालये | (i) 239 AB |
| (ब) संघराज्य प्रदेशातील घटनात्मक यंत्रणा अपयशी ठरल्यास तरतुदी | (ii) 239 B |
| (क) विधीमंडळाच्या विश्रांती काळात अध्यादेश जारी करण्याचा प्रशासकाचा अधिकार | (iii) 240 |
| (ड) विशिष्ट संघराज्य प्रदेशासाठी नियम करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार | (iv) 241 |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | i | iii | iv |
| (2) | iv | i | ii | iii |
| (3) | iii | iv | i | ii |
| (4) | ii | i | iii | iv |

Which of the following is the correct option?

| Provision | Articles |
|---|---|
| (a) High Court for a Union territory | (i) 239 AB |
| (b) Provision in case of failure of constitutional machinery | (ii) 239 B |
| (c) The power of administrators to promulgate Ordinances during recess of Legislature | (iii) 240 |
| (d) Power of President to make regulations for certain Union territories | (iv) 241 |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | i | iii | iv |
| (2) | iv | i | ii | iii |
| (3) | iii | iv | i | ii |
| (4) | ii | i | iii | iv |

19. खालीलपैकी असत्य विधान ओळखा.

(1) संसदेला केंद्रशासित प्रदेशांच्या बाबत कायदा करण्याचा अधिकार आहे.

(2) पुद्दुचेरी विधानसभा राज्यसूची व समवर्ती सूचीतील कोणत्याही विषयावर कायदा करू शकते.

(3) दिल्ली विधानसभा केवळ राज्य सूचीतील सर्व विषयांवर कायदा करू शकते.

(4) राष्ट्रपतींना लक्षद्वीप व अंदमान निकोबार बेटे या केंद्रशासित प्रदेशांच्या सुशासनासाठी नियमने करण्याचा अधिकार आहे.

Identify the incorrect statement among the following.

(1) Parliament has power to legislate in respect of Union Territories.

(2) The Legislative Assembly of Puducherry can make laws on any subject of the State List and Concurrent List.

(3) The Legislative Assembly of Delhi can make laws only on all subjects of the State List.

(4) The President can make regulations for the good governance of Lakshadweep and Andaman and Nicobar Islands.

---

20. संघराज्य प्रदेशांच्या निर्मिती संबंधित खालीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत?

(अ) ब्रिटिश राजवटीच्या काळात 1874 मध्ये काही क्षेत्रे 'अनुसूचित जिल्हे' म्हणून स्थापन केले गेले, ज्यांना नंतर 'मुख्य आयुक्तांचे प्रांत' असे संबोधले जाऊ लागले.

(ब) स्वातंत्र्यानंतर या राज्यांना भाग क व भाग ड या वर्गवारीत ठेवण्यात आले.

(क) सातवा घटनादुरुस्ती कायदा, 1956 आणि राज्य पुनर्रचना कायदा, 1956 यांनुसार त्यांची संघराज्य प्रदेश म्हणून स्थापना केली गेली.

(ड) हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, मिझोराम, अरुणाचल प्रदेश आणि गोवा या पूर्वीच्या संघराज्य प्रदेशांना क्रमाक्रमाने राज्याचा दर्जा दिला गेला.

पर्यायी उत्तरे :

(1) अ, ब, क (2) अ आणि ड

(3) क वगळता सर्व (4) वरील सर्व

Which of the following statements regarding the formation of Union Territories are true?

(a) During British rule, certain areas were constituted as 'Scheduled Districts' in 1874 which later came to be known as ‘Chief Commissioners Provinces'.

(b) After independence, these states were placed in the categories of Part C states and Part D Territories.

(c) They were constituted as Union Territories by the Seventh Constitutional Amendment Act, 1956 and the States Reorganisation Act, 1956.

(d) Gradually Union Territories such as Himachal Pradesh, Manipur, Tripura, Mizoram, Arunachal Pradesh and Goa were successively granted statehood.

Answer options

(1) a, b, c (2) a and d

(3) All except c (4) All of the above

21. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) कलम 2 हे भारतीय संघाचा भाग असलेल्या राज्यांच्या स्थापनेसंबंधी किंवा त्यातील बदलांसंबंधी आहे.

(ब) कलम 3 हे भारतीय संघाचा भाग नसलेल्या नवीन राज्यांच्या स्थापनेसंबंधी किंवा प्रवेशासंबंधी आहे.

पर्यायी उत्तरे:

(1) फक्त अ अयोग्य  (2) फक्त ब अयोग्य

(3) दोन्हीही अयोग्य  (4) दोन्हीही योग्य

Consider the following statements.

(a) Article 2 relates to the formation of or changes in the existing states of the Union of India.

(b) Article 3 relates to the admission or establishment of new states that are not part of the Union of India.

Answer Options:

(1) Only a is incorrect  (2) Only b is incorrect

(3) Both are incorrect  (4) Both are correct

---

22. राज्यघटनेच्या भाग 21 अंतर्गत पुढील राज्यांसंदर्भात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत–

(अ) तेलंगणा  (ब) तमिळनाडू

(क) नागालँड  (ड) मणिपूर

(इ) सिक्कीम  (फ) मेघालय

पर्यायी उत्तरे:

(1) अ, क, ड, इ  (2) ब, क, ड, इ, फ

(3) ब वगळता सर्व  (4) वरील सर्व

Under Part 21 of the Constitution, special provisions have been made in respect of the following States –

(a) Telangana  (b) Tamil Nadu

(c) Nagaland  (d) Manipur

(e) Sikkim  (f) Meghalaya

Answer Options:

(1) a, c, d, e  (2) b, c, d, e, f

(3) All except b  (4) All of the above

---

23. राज्य पुनर्रचना कायदा, 1956 आणि सातवी घटनादुरुस्ती अधिनियम, 1956 यानुसार भारतात ______ राज्ये आणि _____संघराज्य प्रदेश निर्माण करण्यात आले.

(1) 16, 3  (2) 14, 6

(3) 16, 4  (4) 14, 4

According to the States Reorganisation Act, 1956 and the Seventh Constitutional Amendment Act, 1956, ________ states and ___________ union territories were created in India.

(1) 16, 3  (2) 14, 6

(3) 16, 4  (4) 14, 4

24. 29 डिसेंबर 1953 रोजी फाजल अली आयोगाची स्थापना झाली व सप्टेंबर 1955 मध्ये आयोगाने आपला अहवाल सादर केला. या आयोगाने पुढीलपैकी कोणती/त्या शिफारस/ शी केली/ ल्या नाही/ नाहीत?
(अ) राज्यांच्या भाषावार प्रांतरचनेचे तत्व मान्य केले.
(ब) 'एक भाषा, एक राज्य' ही संकल्पना स्विकारली.
(क) मूळ घटनेतील राज्यांचे 4 भागातील वर्गीकरण रद्द केले.
(ड) 16 घटक राज्ये आणि 6 केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्याची शिफारस केली होती.
(इ) शिख राज्य निर्मितीस विरोध केला.
पर्यायी उत्तरे :
(1) फक्त ब आणि ड (2) फक्त ब
(3) फक्त इ (4) फक्त ब आणि इ
The Fazal Ali Commission was set up on 29 December 1953 and submitted its report in September 1955. Which of the following recommendation/s was/were not given by this commission?
(a) Accepted the principle of language as a basis for regionalization of states.
(b) Adopted the theory of 'one language, one state'.
(c) Abolition of four-fold classification of states and territories under the original constitution.
(d) It recommended creation of 16 constituent states and 6 Union Territories.
(e) Opposed the formation of Sikh state.
Answer option
(1) Only b and d (2) Only b
(3) Only e (4) Only b and e

---

25. खालील संस्थानांचा त्यांच्या भारतातील विलीनीकरणानुसार योग्य क्रम ओळखा.
(अ) जुनागढ- सार्वमताने
(ब) जम्मू आणि काश्मीर- करारान्वये
(क) हैद्राबाद- पोलिस कारवाईने
पर्यायी उत्तरे :
(1) अ – ब – क (2) ब – अ – क
(3) अ – क – ब (4) ब – क – अ
Identify the following correct order according to the merger of following princely states in India.
(a) Junagadh- By Referendum
(b) Jammu and Kashmir – By the Instrument of accession
(c) Hyderabad- By police action
Answer options
(1) a – b – c (2) b – a – c
(3) a – c – b (4) b – c – a



चाणक्य मंडल परिवार

26. स्वातंत्र्यानंतर कोणते प्रदेश भारताचा भाग बनले-

(अ) सिक्कीम
(ब) पाँडिचेरी
(क) दादरा आणि नगर हवेली
(ड) गोवा
(इ) दमण आणि दीव
(फ) लक्षद्वीप

पर्यायी उत्तरे:

(1) वरील सर्व
(2) अ, ब, ड, इ, फ
(3) अ, ब, क, ड, इ
(4) ब, क, ड, इ

Which territories became part of India after independence-

(a) Sikkim
(b) Pondicherry
(c) Dadra & Nagar Haveli
(d) Goa
(e) Daman and Diu
(f) Lakshadweep

Answer Options:

(1) All of the above
(2) a, b, d, e, f
(3) a, b, c, d, e
(4) b, c, d, e

---

27. खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही ?

(अ) राष्ट्रपतीच्या शिफारशीशिवाय नवीन राज्य निर्मितीचे विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडले जावू शकत नाही.

(ब) राष्ट्रपतीने असे विधेयक संसदेत मांडण्यापुर्वी विशिष्ट कालावधीमध्ये संबंधित राज्य विधिमंडळाने आपले विचार मांडावेत यासाठी पाठविले पाहिजे.

(क) संसद केवळ विशेष बहुमताने कायदा मंजूर करून नवीन राज्य स्थापन करू शकते.

(ड) संसद भारताचा राजकीय नकाशा आपल्या इच्छेनुसार नव्याने बदलू शकत नाही.

पर्यायी उत्तरे:

(1) फक्त अ
(2) फक्त क आणि ड
(3) फक्त क
(4) फक्त अ आणि ड

Which of the following statements is not correct?

(a) No bills for the formation of a new state shall be introduced in either house of Parliament except on the recommendation of the President.

(b) The President before introducing the bill in the Parliament shall refer it to the concerned State Legislature for its views within a specified time limit.

(c) Parliament can form a new state only by a law passed by a special majority.

(d) Parliament can not redraw the political map of India according to its will.

Answer Options:

(1) Only a
(2) Only c and d
(3) Only c
(4) Only a and d



चाणक्य मंडल परिवार

28. दार कमिशनच्या बाबतीत सत्य नसलेली विधान/ने कोणते/ती?

(अ) एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली जून 1948 मध्ये भारत सरकारने भाषावार प्रांत आयोगाची स्थापना केली.

(ब) पन्नालाल, जगत नारायण लाल हे या आयोगाचे सदस्य होते.

(क) डिसेंबर, 1948 मध्ये आयोगाने आपला अहवाल सादर केला.

(ड) भाषा या घटकाऐवजी प्रशासनिक सोयीनुसार प्रांतांची रचना करावी, अशी शिफारस केली.

पर्यायी उत्तरे:

(1) अ, ब, क, ड (2) यापैकी नाही

(3) फक्त ब (4) फक्त अ

Which statement/s is/are not true about the Dhar Commission?

(a) In June 1948, the Government of India appointed the Linguistic Provinces Commission under the chairmanship of S. K. Dhar.

(b) Pannalal, Jagat Narayan Lal were members of this commission.

(c) In December, 1948, the Commission submitted its report.

(d) It is recommended that the reorganisation of states on the basis of administrative convenience rather than linguistic factor.

Answer Options:

(1) a, b, c, d (2) None of this

(3) Only b (4) Only a

---

29. योग्य जोड्या जुळवा.

| **राज्य** | **स्थापना वर्ष** |
|---|---|
| (अ) मेघालय | (i) 1966 |
| (ब) हरियाणा | (ii) 1972 |
| (क) अरूणाचल प्रदेश | (iii) 1975 |
| (ड) सिक्कीम | (iv) 1987 |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | i | ii | iii |
| (2) | i | ii | iv | iii |
| (3) | ii | i | iii | iv |
| (4) | ii | i | iv | iii |

Match the correct pairs.

| State | Establishment Year |
|---|---|
| (a) Meghalaya | (i) 1966 |
| (b) Haryana | (ii) 1972 |
| (c) Arunachal Pradesh | (iii) 1975 |
| (d) Sikkim | (iv) 1987 |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | i | ii | iii |
| (2) | i | ii | iv | iii |
| (3) | ii | i | iii | iv |
| (4) | ii | i | iv | iii |



चाणक्य मंडल परिवार

30. कलम 4 कशाशी संबंधित आहे?

(1) नवीन राज्य निर्माण करणे व सध्याच्या राज्यांची क्षेत्रे, सीमा किंवा नाव यात बदल करणे.

(2) कलम 2 व कलम 3 अंतर्गत राज्यघटनेत केलेले बदल संसदेच्या साध्या बहुमताने केले जातील.

(3) घटना लागू होताना प्राप्त होणारे नागरिकत्व

(4) यापैकी नाही.

What does Article 4 relate to?

(1) Formation of new states and alteration of areas, boundaries or names of existing states.

(2) Amendments to the Constitution under Article 2 and Article 3 shall be passed by a simple majority of the Parliament.

(3) Citizenship at the commencement of the Constitution

(4) None of these.

---

31. 102 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2017 नुसार घटनेत कोणते बदल करण्यात आले?

(अ) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगास घटनात्मक दर्जा देण्यासाठी कलम 338 (B) या नव्या कलमाचा समावेश करण्यात आला.

(ब) कलम 342 (A) अंतर्गत राज्य व केंद्रशासित प्रदेशांमधील सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गीयांची यादी तयार करण्याचे अधिकार संसदेला देण्यात आले.

(क) कलम 366 (26) (C) अंतर्गत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाची व्याख्या करण्यात आली.

पर्यायी उत्तरे:

(1) फक्त अ आणि क (2) फक्त अ आणि ब

(3) फक्त अ (4) अ, ब आणि क

What changes were made in the Constitution by the 102nd Constitutional Amendment Act, 2017?

(a) A new Article 338 (B) was inserted to give constitutional status to the National Commission for Backward Classes.

(b) Under Article 342 (A) the Parliament was empowered to prepare a list of socially and educationally backward classes in the States and Union Territories.

(c) Socially and educationally backward class was defined under Article 366 26 (C).

Answer Options:

(1) Only a and c (2) Only a and b

(3) Only a (4) a, b and c



चाणक्य मंडल परिवार

32. घटनादुरुस्ती विधेयकासंदर्भात खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) भारताने घटनादुरुस्तीची पद्धत दक्षिण आफ्रिकेच्या राज्यघटनेतून स्विकारली आहे.

(2) घटनेच्या भाग 20 मधील कलम 368 मध्ये घटनादुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार आणि त्याची प्रक्रिया सांगितली आहे.

(3) घटनादुरुस्ती विधेयकास न्यायालयात आव्हान देता येत नाही.

(4) यापैकी नाही.

Which of the following statements regarding the Constitution Amendment Bill is incorrect?

(1) India has adopted the process of constitutional amendment from the constitution of South Africa.

(2) Article 368 of Part 20 of the Constitution states the power of Parliament to amend the Constitution and its procedure.

(3) Constitutional amendment bill cannot be challenged in court.

(4) None of these.

---

33. खालीलपैकी कोणती घटनादुरुस्ती राज्यघटनेच्या भाग - I च्या अंतर्गत येत नाहीत?

(अ) सातवी घटनादुरुस्ती अधिनियम, 1956
(ब) दहावी घटनादुरुस्ती अधिनियम, 1961
(क) बारावी घटनादुरुस्ती अधिनियम, 1962
(ड) चौदावी घटनादुरुस्ती अधिनियम, 1962
(इ) अठरावी घटनादुरुस्ती अधिनियम, 1966

पर्यायी उत्तरे:

(1) ड आणि इ
(2) अ, ड, इ
(3) अ, ब, क, ड, इ
(4) यापैकी नाही

Which of the following Constitutional Amendments does not come under Part - I of the Constitution?

(a) Seventh Constitutional Amendment Act, 1956
(b) Tenth Constitutional Amendment Act, 1961
(c) Twelfth Constitutional Amendment Act, 1962
(d) Fourteenth Constitutional Amendment Act, 1962
(e) Eighteenth Constitutional Amendment Act, 1966

Answer Options:

(1) d and e
(2) a, d, e
(3) a, b, c, d, e
(4) None of these



चाणक्य मंडल परिवार

34. _______ अन्वये राज्यघटनेच्या भाग 22 मध्ये कलम 394 (A) या नवीन कलमाचा समावेश करत हिंदी भाषेतील अधिकृत राज्यघटनेची तरतूद करण्यात आली.

(1) 42 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1976
(2) 70 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1992
(3) 58 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1987
(4) 56 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1987

________ provided for an official Constitution in the Hindi language by inserting a new Article 394 (A) in Part 22 of the Constitution.

(1) $42^{nd}$ Constitutional Amendment Act, 1976
(2) $70^{th}$ Constitutional Amendment Act, 1992
(3) $58^{th}$ Constitutional Amendment Act, 1987
(4) $56^{th}$ Constitutional Amendment Act, 1962

---

35. खालीलपैकी अयोग्य विधान कोणते?

(1) 11 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1989 अन्वये उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे वय 60 वर्षांवरून 62 वर्षांपर्यंत वाढविण्यात आले.

(2) 61 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1988 अन्वये मतदारांचे वय 21 वर्षांवरून 18 वर्षांपर्यंत करण्यात खाली आले.

(3) 70 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1992 अन्वये दिल्ली व पद्दुचेरी विधानसभा सदस्यांचा राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी निर्वाचन मंडळात समावेश करण्यात आला.

(4) 94 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2006 अन्वये झारखंड व छत्तीसगडसाठी आदिवासी कल्याण मंत्री नेमण्याची तरतूद करण्यात आली.

Which of the following statements is incorrect?

(1) Under the $11^{th}$ Constitutional Amendment Act, 1989, the age of High Court Judges was increased from 60 years to 62 years.

(2) Under the $61^{st}$ Constitutional Amendment Act, 1988 the voting age was reduced from 21 years to 18 years.

(3) Under the $70^{th}$ Constitutional Amendment Act, 1992, the members of the Legislative Assembly of Delhi and Puducherry were included in the Electoral College for the election of the President.

(4) Under the $94^{th}$ Constitutional Amendment Act, 2006 provision was made for appointment of Tribal Welfare Minister for Jharkhand and Chhattisgarh.

चाणक्य मंडल परिवार

36. 91 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2003 अन्वये राज्यघटनेच्या कोणत्या कलमांमध्ये बदल करण्यात आला?

(अ) कलम 74 (ब) कलम 75

(क) कलम 163 (ड) कलम 164

(इ) कलम 361 B (फ) कलम 105

पर्यायी उत्तरे :

(1) अ, क, इ (2) ब, ड, इ

(3) अ, क, फ (4) ब, ड, फ

Which Articles of the Constitution were amended by the 91st Amendment Act, 2003?

(a) Article 74 (b) Article 75

(c) Article 163 (d) Article 164

(e) Article 361 B (f) Article 105

Answer option

(1) a, c, e (2) b, d, e

(3) a, c, f (4) b, d, f

---

37. भारतीय राज्यघटनेत 42वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1976 नुसार खालीलपैकी कोणत्या मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला आहे?

(अ) समान न्याय व कायदेविषयक मोफत सेवा

(ब) राज्य, उत्पन्न, दर्जा, संधी यांच्या बाबतीतील विषमता कमी करेल.

(क) औद्योगिक व्यवस्थापनामध्ये कामगारांचा सहभाग सुनिश्चित करणे

(ड) पर्यावरण संरक्षण व संवर्धन आणि वन्य व वन्यजीवांचे रक्षण करणे.

पर्यायी उत्तरे :

(1) अ, ब, क, ड

(2) अ, ब, क

(3) अ, क, ड

(4) अ, ब, ड

Which of the following Directive Principles has been included in the Constitution of India by the 42nd constitutional amendment Act, 1976?

(a) Equal justice and free legal services

(b) State will reduce inequality in terms of income, status, opportunity.

(c) Ensuring participation of workers in industrial management

(d) Protection and conservation of environment and safeguard forest and wildlife.

Answer option

(1) a, b, c, d (3) a, b, c

(3) a, c, d (4) a, b, d



चाणक्य मंडल परिवार

38. खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य पर्याय निवडा.

(1) भारतात, घटना दुरुस्ती विधेयक केवळ राष्ट्रपतीच्या पूर्व-परवानगीने संसदेमध्ये मांडले जावू शकते.

(2) अमेरिकेत घटनेमध्ये दुरुस्ती करण्यासाठी विशेष घटना सभा असते.

(3) अमेरिकेत प्रत्येक घटनादुरुस्तीस किमान दोन-तृतीयांश घटक राज्यांच्या विधिमंडळाद्वारे मान्यता मिळणे आवश्यक असते.

(4) वरील सर्व विधाने बरोबर आहेत.

Consider the following statements and choose the correct option.

(1) In India, a constitutional amendment bill can be introduced in the Parliament only with the prior permission of the President.

(2) In U.S.A, there is a special Constituent Assembly to amend the Constitution.

(3) In U.S.A., every constitutional amendment must be ratified by at least two-thirds of the state legislature.

(4) All of the above statements are correct.

---

39. खालीलपैकी कोणत्या तरतुदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी संसदेचे विशेष बहुमत आणि निम्म्यापेक्षा अधिक राज्यांच्या विधीमंडळांची साध्या बहुमताची आवश्यकता असते?

(अ) अधिकृत भाषेचा वापर
(ब) परिशिष्ट 7 मधील कोणतीही सूची
(क) संसदेतील राज्याचे प्रतिनिधित्व
(ड) सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये
(इ) कलम 368

पर्यायी उत्तरे :

(1) अ वगळता सर्व
(2) ड वगळता सर्व
(3) क वगळता सर्व
(4) अ, ब, क, ड, इ

Which of the following provisions requires a special majority of Parliament and also with the consent of half of the state legislature by a simple majority.

(a) Use of official language
(b) Any of the list in seventh schedule
(c) State representation in Parliament
(d) Supreme Court and High Courts
(e) Article 368

Answer option

(1) All except a
(2) All except d
(3) All except c
(4) a, b, c, d, e

40. 44वी घटनादुरुस्ती अधिनियम 1978 द्वारे खालीलपैकी कोणत्या तरतूदी करण्यात आल्या आहेत?
(अ) अखिल भारतीय न्यायिक सेवा निर्माण करण्याबाबत तरतूद करण्यात आली.
(ब) मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला एकदा पुनर्विचारार्थ परत पाठविण्याचा राष्ट्रपतीस अधिकार देण्यात आला.
(क) राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात अनुच्छेद 20 आणि अनुच्छेद 21 अन्वये हमी दिलेले मूलभूत अधिकार निलंबित करता येणार नाहीत अशी तरतूद करण्यात आली.
(ड) घटनादुरुस्ती न्यायिक पुनर्विलोकनाच्या व्याप्तीबाहेर ठेवण्यात आली.
पर्यायी उत्तरे :
(1) अ, ब आणि क (2) अ, ब आणि ड
(3) फक्त ब आणि क (4) फक्त अ आणि ड
Which of the following provisions were made by the 44th Amendment Act of 1978?
(a) Provided for the creation of the All India Judicial Service.
(b) Empowered the President to send back once, the advice of the Cabinet for reconsideration.
(c) Provided that the Fundamental Rights guaranteed by Article 20 and Article 21 cannot be suspended during the National Emergency.
(d) Constitutional amendments were kept outside the scope of judicial review.
Answer Options:
(1) a, b and c (2) a, b and d
(3) Only b and c (4) Only a and d

---

41. घटनादुरुस्ती विधेयकाविषयी कोणत्या बाबी खऱ्या आहेत?
(अ) संसदेच्या कोणत्याही गृहात घटनादुरुस्ती विधेयक सादर करता येते.
(ब) केवळ मंत्री हे विधेयक सादर करू शकतात.
(क) हे विधेयक संसदेच्या प्रत्येक गृहाने गृहातील एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने आणि उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन-तृतीयांश बहुमताने संमत करणे आवश्यक आहे.
(ड) 42 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1976 अन्वये राष्ट्रपतीने घटनादुरुस्ती विधेयकास मान्यता देणे बंधनकारक करण्यात आले आहे.
पर्यायी उत्तरे :
(1) अ, ब, क, ड (2) अ आणि क
(3) अ, ब, क (4) अ, ब, ड
Which statements about the Constitutional Amendment Bill are true?
(a) The constitutional amendment bill can be introduced in either house of Parliament.
(b) Only the Minister can introduce the Bill.
(c) The Bill must be passed by each House of Parliament by a majority of the total number of members in the House and two-thirds majority of the members present and voting.
(d) The 42nd Amendment Act, 1976 has made it mandatory for the President to assent to the Amendment Bill.
Answer Options:
(1) a, b, c, d (2) a and c
(3) a, b, c (4) a, b, d

42. खालील विधाने विचारात घ्या आणि 106 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2023 संबंधी अचूक विधाने कोणती?

(अ) हे विधेयक नारी शक्ती वंदन विधेयक म्हणून ओळखले जाते.

(ब) 28 सप्टेंबर 2023 रोजी राष्ट्रपतींनी हे विधेयक संमत केले.

(क) या घटनादुरुस्ती अन्वये राज्यघटनेतील कलम 239 AA मध्ये दुरूस्ती करण्यात आली असून कलम 330 A, 332 A व 334 A ही तीन कलमे राज्यघटनेत नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत.

(ड) या कायद्यानुसार लोकसभा, प्रत्येक राज्याची विधानसभा आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्लीच्या विधानसभेतील एकूण जागांपैकी एक तृतीयांश जागा 15 वर्षांसाठी महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे.

पर्यायी उत्तरे :

(1) अ, ब, क, ड (2) अ आणि ड

(3) अ, क, ड (4) अ आणि क

Consider the following statements and which are the correct statements regarding the 106th Constitutional Amendment Act, 2023?

(a) This Bill is known as Nari Shakti Vandan Bill.

(b) The Bill was passed by the President on 28 September 2023.

(c) Under this amendment, Article 239 AA of the Constitution has been amended while three new articles namely Article 330 A, 332 A and 334 A have been included in the constitution.

(d) This Act provides for one-third of total seats in the House of the People, the Legislative Assembly of every State and the Legislative Assembly of the National Capital Territory of Delhi to be reserved for women for 15 years.

Answer Options:

(1) a, b, c, d (2) a and d

(3) a, c, d (4) a and c

43. 42 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1976 द्वारे खालीलपैकी कोणत्या तरतूदी करण्यात आल्या आहेत?
(अ) राज्यातील राष्ट्रपती राजवटीचा कालावधी एकावेळी सहा महिन्यांऐवजी एक वर्षाने वाढविता येईल, अशी तरतूद करण्यात आली.
(ब) अखिल भारतीय न्यायिक सेवा निर्माण करण्याची तरतूद करण्यात आली.
(क) मालमत्तेचा हक्क हा केवळ कायदेशीर अधिकार करण्यात आला.
(ड) शिक्षण, वने, वन्यपशू व पक्षी यांचे संरक्षण, वजन व मापे आणि न्यायव्यवस्थेचे प्रशासन, सर्वोच्च व उच्च न्यायालये वगळता इतर सर्व न्यायालयांचे संघटन व संरचना हे पाच विषय राज्य सूचीतून समवर्ती सूचीत हलविण्यात आले.
पर्यायी उत्तरे :
(1) अ, ब, क (2) ब, क, ड
(3) अ, ब, ड (4) अ, क, ड
Which of the following provisions have been made by the $42^{nd}$ Constitutional Amendment Act, 1976?
(a) Extended the one-time duration of the President's rule in a state from 6 months to one year.
(b) Provision was made for creation of All India Judicial Service.
(c) The right to property was made a mere legal right.
(d) Shifted five subjects from the state list to the concurrent list, viz., education, forests, protection of wild animals and birds, weights and measures and administration of justice, constitution and organisation of all Courts except the Supreme and High Courts.
Answer Options:
(1) a, b, c (2) b, c, d
(3) a, b, d (4) a, c, d

---

44. 104 वी घटनादुरुस्ती संदर्भात अचूक विधाने ओळखा.
(अ) 104 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2021 अंतर्गत लोकसभा व राज्य विधानसभेतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यासाठी जागांचे आरक्षण दहा वर्षांनी वाढविण्यात आले.
(ब) या घटनादुरुस्ती अंतर्गत राज्यघटनेतील अनुच्छेद 331 व अनुच्छेद 333 वगळण्यात आले, तर अनुच्छेद 334 मध्ये दुरूस्ती सुचविण्यात आली.
पर्यायी उत्तरे :
(1) फक्त अ बरोबर (2) फक्त ब बरोबर
(3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक
Identify the correct statements regarding the 104th Constitutional Amendment.
a) Under the $104^{th}$ Constitutional Amendment Act, 2021, the reservation of seats for Scheduled Castes, Scheduled Tribes in the Lok Sabha and State Legislative Assemblies was extended by ten years.
(b) Under this Constitutional amendment Act, Article 331 and Article 333 of the Constitution were repealed while Article 334 was amended.
Answer Options:
(1) Only a is correct (2) Only b is correct
(3) Both are correct (4) Both are incorrect

45. कोणत्या घटनादुरुस्तीद्वारे अरूणाचल प्रदेशमध्ये पंचायतीत असलेले अनुसूचित जातींसाठीचे आरक्षण रद्द करण्यात आले?

(1) 73 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1992

(2) 57 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1987

(3) 83 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2000

(4) 84 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2001

Reservation for Scheduled Castes in Panchayats was abolished in Arunachal Pradesh by which constitutional amendment?

(1) 73rd Constitutional Amendment Act, 1992

(2) 57th Constitutional Amendment Act, 1987

(3) 83rd Constitutional Amendment Act, 2000

(4) 84th Constitutional Amendment Act, 2001

---

46. 2001 च्या 84व्या घटनादुरुस्ती कायद्यानुसार योग्य विधान ओळखा.

(अ) या कायद्यान्वये 2026 पर्यंत लोकसभा व विधानसभा मतदारसंघांची पुनर्रचना केली जाणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे.

(ब) तसेच राज्यांतील मतदार संघांच्या क्षेत्राची पुनर्रचना करण्यासाठी 2001 च्या जनगणनेचा आधार घेतला जाईल, अशीही तरतूद करण्यात आली.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ योग्य (2) फक्त ब योग्य

(3) दोन्हीही योग्य (4) दोन्हीही अयोग्य

Identify the correct statement about the 84th Constitutional Amendment Act, 2001.

(a) Under this Act, it has been provided that Lok Sabha and state legislature constituencies will not be reconstituted till 2026.

(b) It was also provided that the 2001 census would be taken as the basis for delimitation of constituencies in the states.

Answer options

1) Only a is correct

(2) Only b is correct

(3) Both are correct

(4) Both are incorrect

---

47. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांच्या संदर्भात असलेल्या 2021 च्या 105 व्या घटनादुरुस्ती कायद्यानुसार अचूक विधान/ ने कोणते/ती?
(अ) 105 व्या घटनादुरुस्ती कायद्याने संविधानाच्या अनुच्छेद 338B, 342A आणि 366 या तीन कलमांमध्ये सुधारणा केली.
(ब) अनुच्छेद 342 (A) अंतर्गत प्रत्येक राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाला त्यांच्या स्वतःच्या हेतूंसाठी सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांची यादी तयार करण्याचा आणि राखण्याचा अधिकार देण्यात आला आहे.
(क) अनुच्छेद 366 (26) (C) अंतर्गत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाची व्याख्या करण्यात आली.
पर्यायी उत्तरेः
(1) फक्त अ आणि क
(2) फक्त अ आणि ब
(3) फक्त अ
(4) अ, ब आणि क
Which of the following statement/s are correct about 105th Constitutional amendment act, 2021 related to socially and economically backward classes?
(a) The 105th Constitutional Amendment Act amended three articles of the Constitution namely Articles 338B, 342A and 366.
(b) Under Article 342 (A) every State or Union Territory is empowered to prepare and maintain a list of socially and educationally backward classes for its own purposes.
(c) Under Article 366 (26) (C) definition of socially and educationally backward class is prescribed.
Answer Options:
(1) Only a and c
(2) Only a and b
(3) Only a
(4) a, b and c

---

48. केशवानंद भारती खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने मुलभूत संरचनेचे पुढील घटक सांगितले आहेत-
(अ) राज्यघटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप
(ब) कायदेमंडळ, कार्यकारी विभाग व न्यायव्यवस्था यांत अधिकारांची विभागणी
(क) न्यायालयीन पुनर्विलोकन
(ड) मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे यांमध्ये सुसंगतता
(इ) देशाचे सार्वभौमत्व व एकात्मता
पर्यायी उत्तरे :
(1) अ, ब, क, इ
(2) अ, ब, इ
(3) अ, ब, ड, इ
(4) अ, ब, क, ड, इ
In Kesavananda Bharati case, Supreme court has stated the following elements of basic structure-
(a) Secular nature of the Constitution
(b) Division of powers between legislature, executive and judiciary
(c) Judicial Review
(d) Balance between fundamental rights and directive principles
(e) Sovereignty and integrity of the country
Answer Options:
(1) a, b, c, e
(2) a, b, e
(3) a, b, d, e
(4) a, b, c, d, e



चाणक्य मंडल परिवार

49. खालीलपैकी कोणत्या तरतूदी कलम 368 च्या कक्षेबाहेर येतात-

(अ) परिशिष्ट II
(ब) परिशिष्ट V
(क) परिशिष्ट VI
(ड) परिशिष्ट VIII
(इ) सर्वोच्च न्यायालयाची कार्यकक्षा वाढविणे

पर्यायी उत्तरे :

(1) अ, ड, इ
(2) अ, ब, इ
(3) अ, ब, क, ड
(4) अ, ब, क, ड, इ

Which of the following provisions fall outside the scope of Article 368-

(a) Schedule II
(b) Schedule V
(c) Schedule VI
(d) Schedule VIII
(e) Conferment of more jurisdiction on the Supreme Court

Answer Options:

(1) a, d, e
(2) a, b, e
(3) a, b, c, d
(4) a, b, c, d, e

---

50. 2002 च्या 86 व्या घटनादुरुस्ती कायद्याने कोणकोणत्या कलमांत बदल करण्यात आला?

(अ) कलम 21 A
(ब) कलम 45
(क) कलम 51 (A) (11)
(ड) वरील सर्व

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त ड
(2) फक्त अ आणि क
(3) फक्त ब
(4) फक्त अ आणि ब

Which articles were added by the $86^{th}$ constitutional amendment act, 2002?

(a) Article 21 A
(b) Article 45
(c) Article 51 (A) (11)
(d) All of the above

Answers Options:

(1) Only d
(2) Only a and c
(3) Only b
(4) Only a and b

चाणक्य मंडल परिवार